# **बीआयटी बार्शीत  ‘एटसा’ निमीत्त ‘सकारात्मक विचार’ मार्गदर्शन**

येथील जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ पुणे या समुहाचे बार्शी येथील भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बीआयटी) या अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन अभियांत्रिकी विभाग मध्ये “एटसा- इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजिनीअरिंग स्टुडंट असोशिएशन ” या कार्यक्रामानिमीत्त इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजिनिअरिंग विभागामध्ये ” सकारात्मक विचार - मार्गदर्शन शिबीराचे” आयोजन केले होते. या मार्गदर्शनासाठी बार्शी शहरातील प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थानचे अनिताबहनजी यांनी विद्यार्थ्यांना सकारातत्मक आचार व विचाराने मनुष्याच्या जिवना मध्ये अमुलाग्र असे बदल होऊ शकतात याबद्दल बहूमोल असे मार्गदर्शन केले. तसेच या शिबारासाठी म्हणून गेली ३० वर्षापासून ब्रम्हकुमारींच्या बार्शी सेवाकेंद्राचे संचलन करणा-या संगिताबहनजी यांची प्रमुख उपस्थीती लाभली.

या मार्गदर्शनासाठी बीआयटी महाविद्यालयातील विद्दार्थ्यांनीही मोठ्या संख्येने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम यशस्विपणे पार पाडण्यासाठी महविद्दालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अनिल देशमाने, अकॅडेमिक डिन प्रा. डॉ. एन. जी. नार्वे, विभाग प्रमुख प्रा. पी. सी. ढवळे, व सर्व प्राध्यापक, कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळाले.

